**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८६/२०२०**
**CNR No. MHSO02-001503-2020**

**निशाणी क्र.१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ३ यांनी भारतीय वारसा अधिनियमाच्या कलम ३७२ प्रमाणे वारसाप्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ही मयत पंढरीनाथ भिमाजी सोनवणे यांची सुन असून अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची नातवंडे आहेत. पंढरीनाथ हे दिनांक १९/१०/२०१७ रोजी मयत झाले. पंढरीनाथ यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे पिता आणि मयत पंढरीनाथ यांचा मुलगा भाउसाहेब सोनवणे यांचे दिनांक २९/०२/२०१६ रोजी अपघाती निधन झाले. त्यामुळे अर्जदारांनी एम ए सी पी क्र.८२/२०१६ दाखल केला होता. त्यामध्ये मयत पंढरीनाथ हे सामनेवाला क्र.३ होते. सदरचा अर्ज दिनांक ०२/११/२०१८ रोजी अंशत: मंजूर करण्यात आला. मंजूर रक्कमेपैकी रु.२,००,०००/— इतके पंढरीनाथ भिमाजी सोनवणे यांच्या नावे तीन वर्षाच्या मुदतीकरिता मुदत ठेवीत ठेवण्याचा व रक्कम रु.२,००,०००/— इतकी मयत पंढरीनाथ यांना चेकने अदा करण्याचा हुकूम करण्यात आला. परंतू पंढरीनाथ यांचे त्यापूर्वीच म्हणजे दिनांक १९/१०/२०१७ रोजी निधन झाल्याने दोन्ही रक्कमा न्यायालयात जमा आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे शिवाय पंढरीनाथ यांना इतर कोणी वारस नसल्याने सदर रक्कमा मिळणेकरिता वारसा प्रमाणपत्राची गरज असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जाची नोटीस सामनेवालावर बजावण्यात आली. परंतू सामनेवाले या कामी हजर झाले नाहीत. त्यामुळे सामनेवालाविरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

४. प्रस्तुत अर्जाचा जाहिरनामा नि.क्र.७ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आला. नि.क्र.८ नुसार दैनिक तरुण भारतमध्ये जाहिर प्रसिध्दीकरण देण्यात आले. जाहिरनामा व वर्तमानपत्रातील प्रसिध्दीकरणानंतर विहित मुदतीत कोणीही प्रस्तुतच्या अर्जाचे कामी हजर झाले नाही व या अर्जास हरकत घेतली नाही.

५. अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन खालील प्रश्न माझ्या अवलोकनार्थ उपस्थित होतात. सदरचे प्रश्न त्यावरील कारणमिमांसेसह खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारसाप्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत काय? | ... होय |
| २. | आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. अर्जदार क्र.१ ते ३ तर्फे अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ त्यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र. १० वर दाखल केले आणि नि.क्र.११ ची पुरसीस देवून पुरावा बंद केला. कागदोपत्री पुराव्यामध्ये पंढरीनाथ यांचा मृत्यू दाखला नि.क्र.१२ वर आणि एम ए सी पी क्र.८२/२०१६ च्या दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या निकालपत्राची सही शिक्क्याची नक्कल नि.क्र.१३ वर दाखल केली आहे.

**प्रश्न क्र.१ व २ करिता —**

७. नि.क्र.१२ वरील मृत्यूदाखल्यावरुन दिसून येते की, पंढरीनाथ भिमाजी सोनवणे हे दिनांक १९/१०/२०१७ रोजी मयत झाले. नि.क्र.१३ वरील एम ए सी पी क्र.८२/२०१६ च्या निकालपत्राच्या प्रतीचे अवलोकन करता असे दिसून येते की, मयत पंढरीनाथ यांच्या मुलाचे अपघाती निधनानंतर अर्जदारांनी दाखल केलेल्या या प्रकरणामध्ये मयत पंढरीनाथ सोनवणे यांच्या नावे तीन वर्षाच्या मुदत ठेवीमध्ये रक्कम रु.२,००,०००/— ठेवण्याचे व रक्कम रु.२,००,०००/— इतकी त्यांना चेकने देण्याचे आदेश करण्यात आलेले आहेत. परंतू सदर प्रमाणे अम्मलबजावणी होण्याअगोदर पंढरीनाथ हे दिनांक १९/१०/२०१७ रोजी मयत झाले आहेत.

८. अर्जदार क्र.१ हिने तिच्या सरतपासातील शपथपत्रात अर्जातील मजकूराची पुनरावृत्ती केलेली आहे. अर्जदार क्र.१ हिने कथन केले आहे की, अर्जदार क्र.३ हा अज्ञान असल्याने त्याच्या वतीने अज्ञान पालन कर्ती म्हणून तिच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

९. वरील प्रमाणे तोंडी व लेखी पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, मयत पंढरीनाथ भिमाजी सोनवणे यांचे अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस म्हणून वरील रक्कम मिळणेस पात्र आहेत. मयत पंढरीनाथ यांच्या मुलाचे अपघाती निधनानंतर अर्जदारांनी दाखल केलेल्या नुकसान भरपाई प्रकरणामध्ये मयत पंढरीनाथ सोनवणे यांच्या नावे तीन वर्षाच्या मुदत ठेवीमध्ये रक्कम रु.२,००,०००/— ठेवण्याचे व रक्कम रु.२,००,०००/— इतकी त्यांना चेकने देण्याचे आदेश करण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे अर्जदार क्र.१ यांनी कथन केल्याप्रमाणे अर्जदार क्र.३ हे अज्ञान असल्याने अज्ञान पालनकर्ता म्हणून तिच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास काहीही हरकत नाही. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत पंढरीनाथ भिमाजी सोनवणे यांच्या मृत्यूपश्चात, एम ए सी पी क्र. ८२/२०१६ मधील निकालानुसार त्यांच्या नावे न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.४,००,०००/— इतकी त्यावरील व्याजासह मिळणेकरिता अर्जदार क्र.१ कविता भाउसाहेब सोनवणे यांचे नावे त्यांच्याकरिता व अर्जदार क्र.३ यांचे अज्ञान पालनकर्ते म्हणून आणि अर्जदार क्र.२ कु. श्रेया भाउसाहेब सोनवणे यांचे नावे, आवश्यक असलेले न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेवून वारसाप्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जदारांनी अर्जाचा खर्च स्वत: सोसावयाचा आहे.

सही/—

दिनांक ०१/०४/२०२१

**(किर्ती पी.जैन—देसरडा)**
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
सोलापूर

Certificate

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original.

| | |
|---|---|
| Name of stenographer | S.S.Shekhadar |
| Court | Jt. Civil Judge, SD Solapur |
| Date | 10.02.2021 |
| Order signed on | 10.02.2021 |
| Order uploaded on | 11.02.2021 |